N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** वाशिम **P.S.(ठाणे):** रिसोड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0102 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**07/02/2023 21:47

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 07/02/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 07/02/2023

**Time From (वेळेपासून):** 14:54 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:12 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 07/02/2023 **Time (वेळ):** 21:29 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 047

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/02/2023 21:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पोलीस स्टेशन रिसोड ,रिसोड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): गजानन जानकीराम पदमने

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1983

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अंजनी बु ,मेहकर ,मेहकर,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अंजनी बु ,मेहकर ,मेहकर,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पोहेकॉं विशाल कुंडलिक एकाडे ब.नं. 818 | | | 1. पोलीस स्टेशन रिसोड ,रिसोड , रिसोड ,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | संतोष काळदाते | | | 1. वाशिम ,वाशिम,रिसोड ,वाशिम, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये किंमतीच्या 20 नोटा | 10,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद रिसोड दिनांक:-07.02.2023 गजानन जानकीराम पदमने वय 40 वर्शे, व्यवसाय -खाजगी व्यवसाय रा.अंजनी बु.ता.मेहकर जि. बुलढाणा, मो.नं.8888123033 मी वरील ठिकाणी परिवारासह राहत असुन स्वतःचे पोकल्यांड मशिन भाडयाने देण्याचा खाजगी व्यवसाय करतो. मी दिनांक 31/01/2023 रोजी माझे पोकल्यांड मशीन घेवुन श्री रमेश आल्हाट रा.कवठा चिखली यांचे शेतात विहीर खोदण्याचे काम करीत होतो. त्यावेळी तेथील कामावर माझ्या मशीन सोबतच डोणगाव येथील बंडु गवळी व प्रभु (राजस्थानी इसम पुर्ण नाव माहित नाही.) यांचे ब्लास्टींगचे ट्रॅक्टर देखील होते, त्यादिवशी दुपारी अंदाजे दोन ते अडीच वाजण्याचे दरम्यान माझ्या ओळखीचे संदिप बहीरे, संतोश च-हाटे अचानक तेथे आले व ते माझ्यासोबत आमच्या मागील उधारीच्या पैशावरुन चर्चा करु लागले. त्यावेळी अचानक तेथे पोलीसांची जीप आली त्यामधुन दोन ते तीन व्यक्ती साध्या कपडयामध्ये उतरले त्यापैकी एक कर्मचारी याने मला पोलीस जीप मध्ये बसण्यास सांगीतले, मी त्यांना विचारले की तुम्ही कोण आहात तर त्यांनी त्यांचा मी जमादार विशाल ऐकाडे पोलीस स्टेशन रिसोड येथील असल्याबाबत परीचय मला करुन दिला, आणि त्यांनी मला पोलीस जीप मध्ये बसविले, त्यानंतर त्यांनी कामाच्या ठिकाणी उभी असलेली माझे वडील श्री जानकीराम पदमने यांचे मालकीची बजाज डिस्कव्हर मोटरसायकल जीचा क्रमांक एम एच 28 क्यु 2284 हि ताब्यात घेवुन मला पोलीस स्टेशनला आणले तेथे त्यांनी माझा ओपो कंपणीचा मोबाईल माझे कडुन काढुन घेतला आणि माझ्यावर खोटा गुन्हा नंबर 73/23 कलम 5 ज्व.पदार्थ अधि.1952, 5,9(ब)1(ब) बारी.अधि.1884 दाखल केला. त्यानंतर जमादार विशाल ऐकाडे मला म्हटले की, तुझ्यावर माझे फिर्यादीनेच गुन्हा दाखल झाला आहे आणि हया गुन्हयाचे काम सुध्दा मीच करणार आहे, तुला जर घरी जायचे असेल आणि तुला आज दाखल गुन्हयात जमानत करुन तुझी मोटरसायकल व मोबाईल तुला परत हवा असेल तर 1,20,000 रुपये दयावे लागतील त्यावेळी मी त्यांना माझे कडे इतके पैसे नसल्याचे सांगीतले असता तेव्हा तडजोडी अंती त्यांनी मला 60,000 रुपयांची मागणी केली, त्यावेळी मी माझे कडील 23,000 रुपये व शेतकरी रमेश नामदेव अल्हाट रा.कवठा यांचे कडुन 17,000 रुपये घेवुन असे एकुण 40,000 रुपये जमादार विशाल ऐकाडे यांना दिले होते. पैसे दिल्यानंतर मी त्यांना आता मला जावु दया आणि माझे मोटरसायकल व मोबाईल मला परत करा असे म्हटलो असता जमादार विशाल ऐकाडे यांनी मला उर्वरीत 20,000 रुपये तु माझे परीचयाचे संतोश काळदाते रा.वाशिम यांचे कडे दिल्यानंतरच मी तुझी जमानत करील आणि गुन्हयात मदत करुन तुझी मोटरसायकल व मोबाईल तुला परत करेल नाहीतर मी तुझ्याविरुध्द दाखल गुन्हयात तुला अटक करेल असे म्हटले. त्यावेळी मी घाबरलेलो असल्याने जमादार विशाल ऐकाडे यांना त्यांनी सांगीतल्याप्रमाणे संतोश काळदाते यांच्या मार्फतीने नाईलाजास्तव 20,000रुपये लाच देण्याचे कबुल केले आहे माझी पैसे देण्याची इच्छा नाही. पोलीस स्टेशन रिसोड येथे माझ्यावर दाखल गुन्हयात मला मदत करण्या करीता आणि माझी पो.स्टे रिसोड येथे आणलेली मोटरसायकल व घेतलेला मोबाईल मला परत देण्याकरीता 20,000/-रु खर्च येत नाही तसेच अशा प्रकारे पोलीस स्टेशनला कुठलीही फि लागत नाही. हे मला माहित आहे. जमादार विशाल ऐकाडे व संतोश काळदाते यांच्याशी माझा कोणताही देण्याघेण्याचा किंवा उसणवारीचा व्यवहार नसून आपशी दुष्मनी नाही. पोलीस जमादार विशाल ऐकाडे व खाजगी व्यक्ती संतोश काळदाते यांच्यावर कारवाही करावी या करीता तक्रार देत आहे. कारवाही होण्यास विनंती आहे. "

मी वरील प्रमाणे माझी लेखी तक्रार दिल्यानंतर पो.नि.भोसले, यांनी मला व दोन्ही पंचांना मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी कारवाई करणे असल्याचे कळविले तसेच मला व पंचांना व्हाईस रेकॉर्डर व मेमरी कार्ड बाबत तसेच कारवाई बाबत माहीती दिली. त्यानंतर मला व पंच कर्म.क्र. 1 श्री. संतोश रोठे यांना गै.अ. पोलीस जमादार विशाल ऐकाडे व खाजगी इसम संतोश काळदाते यांचे भेटी दरम्यान करावयाचे कार्यवाही बाबत माहिती दिली. पोलीस जमादार विशाल ऐकाडे व खाजगी इसम संतोश काळदाते यांचे लाच मागणी बाबत त्यांची पडताळणी करीता मला, पंच क्र.1 श्री.रोठे यांचेसह पोलीस स्टेशन रिसोड येथे पाठविले.

पोलीस स्टेशन रिसोड येथे पहीले संतोश काळदाते खाजगी इसम यांची पोलीस स्टेशन रिसोड समोर भेट

झाली. मी खाजगी इसम संतोश काळदाते यास म्हटले लाव बर फोन म्हणाव 20 हजार रुपयाचं काय करायच? त्याहले म्हणाव एव्हडे नाहीतं पंधराक हजार रुपये हायते, त्यावर संतोशने तुम्ही चला तुम्हीच बोला मी बोलत नाही....समोरासमोर बोला खंड तोडा मंग दया, बोलानं तुमच्या हिशोबानं.... त्यावर मी संतोश काळदाते ला करुन टाका अनं मले मोकळं करुन टाका..., वरुन संतोश म्हणला तुम्हालं खंड तोडल तेव्हडे बोलल तेव्हडे माहया हाती दया बस...असे म्हणुन संतोश ने ऐकाडे जमादार यांना फोन लावला आम्ही दोघे चालत चालत ऐकाडे साहेब यांचे पो.स्टे.चे इमारतीला लागुन असलेल्या महिला कक्षाचे बाजुला असलेल्या कार्यालयात आलो तिथे विशाल ऐकाडे पोलीस जमादर हजर होते. संतोश ने ऐकाडे जमादार यांना म्हटले हा एक मांगायले अन तुम्ही एक मांगायले.... मी संतोश यास अरे नाही न रे.... ओ म्हटले असता संतोश यांने नाही नाही मुदामच सांगायलो... त्यावर जमादार विशाल ऐकाडे यांनी त्यांचे समोर कागदावर 20,000/-रु चा आकडा लिहुन एव्हड होतं.... असे म्हणुन परत 10,000/-रु आकडा लिहुन एव्हड करुन टाका......, असे म्हटले. मी त्यांना हो विस हजार कबुल होते आता दहा हजार...., यावर जमादार विशाल ऐकाडे यांनी काही नाराजी नाही नं....., असे म्हटले असता मी त्यांना नाही साहेब तुम्ही म्हणल्यावर.....,असे म्हटले.पोलीस जमादार ऐकाडे यांनी मला नाही ते राहयले तरी चालते..., मी परत त्यांना नाही नाराजी काही नाही......, असे म्हटले असता जमादार विषाल ऐकाडे यांनी या मंग...., असे म्हटले असता संतोश काळदाते ने वाशिम हुन आल्यावर देतो...., त्यावर जमादार विशाल ऐकाडे म्हणतात बर या जाउन......, असे म्हटले असता संतोश काळदाते यांने जमादार ऐकाडे यांना इथं जर देले तं इंथ घेतो फोन पे केले तं वाशिम लं घेतो वाशिम लं चालेलनं.........., असे म्हटले असता जमादार विशाल ऐकाडे यांनी वाशिम लं...., असे म्हणुन पोलीस जमादार विषाल ऐकाडे यांनी मला 20,000/-रु लाचेची मागणी करुन तडजोड अंती 10,000/-रुपये लाचेची मागणी केली. तसेच संतोश काळदाते याने पोलीस जमादार विशाल ऐकाडे यांचे लाच मागणीस समर्थन देवुन लाच रक्कम स्विकारण्यास तयारी दर्शविली.पैशाची व्यवस्था न झाल्यामुळे फोनव्दारे संतोश यास उदया पैसे देतो असे सांगीतले. वरून दि.07.02.2023 रोजी सापळा आयोजीत करण्याचे ठरले. या संबंधीचा पडताळणी पंचनामा पुर्ण करण्यात आला.

दिनांक 07.02.2023 रोजी मी ला.प्र.वि. कार्यालय वाशिम येथे आलो. पो.नि.भोसले दोन्ही पंच व स्टाफ यांची भेट झाली. तसेच पोलीस उपअधिक्षक शेळके यांची भेट झाली. आलोसे विशाल ऐकाडे किंवा संतोश काळदाते यांना देणे करीता मी आणलेली लाच रक्कम 500/-रूपये दराच्या 20 नोटा, एकुण 10,000/-रूपये पंचासमक्ष हजर केल्या. त्यावरून त्या नोटांचे वर्णन व क्रमांक नोंद करुन पंचासमक्ष अँन्थ्रासिन पावडर चे गुणधर्मा बाबत व अल्ट्रव्हायलेट लॅम्प बाबत माहीती देण्यात आली. पो.नि.भोसले यांनी, पंच व स्टाफ यांना पुढील सापळा कार्यवाही बाबतच्या सुचना दिल्या. मी पोलीस जमादार विशाल ऐकाडे यांना फोनव्दारे संपर्क करुन भेटण्याकरीता विचारले असता विशाल ऐकाडे जमादार यांनी मला रिसोड येथे पोलीस स्टेशनला यायला सांगीतले. आम्ही सर्व खाजगी वाहनाने व मी मोटार सायकले वाशिम येथुन रिसोड येथे आलो. पोलीस स्टेशन रिसोड परिसरात सापळा कार्यवाहीचे आयोजन करण्यात आले.

पोलीस जमादार विशाल ऐकाडे यांचेसोबत पोलीस स्टेशन रिसोड परीसरातील पो.स्टेचे इमारतीला लागुन असलेल्या महिला कक्षाचे बाजुला असलेल्या खोली मध्ये भेट झाली. त्यांचे मध्ये बोलणे झाले. त्यांनी मला आणले काय असे म्हटले असता मी हं असे म्हणुन म्हणुन लाच रक्कम 10,000/-रु खिशातुन काढून पोलीस हवालदार विशाल ऐकाडे यांचे समोर धरली असता त्यांनी 10,000/-रु लाच रक्कम स्विकारुन खोलीत असलेल्या लोखंडी कपाटामध्ये ठेवले. मी सापळा पथकास पुर्वनियोजित इशारा केला असता सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी हे खोली मध्ये आले. पोलीस हवालदार विशाल ऐकाडे यांना लाच रक्कम रु. 10,000/- सह पंचासमक्ष रंगेहाथ पकडले.

लोकसेवक जि.वाशिम यांनी माझे विरुध्द पोलीस स्टेशन रिसोड येथे दाखल असलेल्या गुन्हयात मला मदत करण्याकरीता तसेच माझी मोटार सायकल व मोबाईल पो.स्टे.ला जमा असलेला परत करण्याकरीता, आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन स्वतःचे आर्थीक फायदया करीता गैरमार्गाने दि.06.02.2023 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान 20,000/-रु लाचेची मागणी करुन 10,000/-रु स्विकारण्यास तयारी दर्शविली. तसेच संतोश काळदाते रा.वाशिम यांनी त्यांचे लाच मागणीला समर्थन देवुन लाच देण्यास प्रोत्साहन दिले. सापळा कारवाई दरम्यान पोलीस हवालदार विशाल ऐकाडे यांनी माझे कडून लाच रक्कम 10,000/-रूपये पोलीस स्टेशन रिसोड चे इमारतीला लागुन असलेल्या महिला कक्षाचे बाजुला असलेल्या खोली मध्ये आज दि.07.02.2023 रोजी 16.12 वा.चे सुमारास स्विकारली आहे. करीता माझी पोलीस हवालदार विशाल ऐकाडे व संतोश काळदाते यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद पोहवा नितीन टवलारकर, ला.प्र.वि. वाशिम यांनी लॅपटॉपवर टंकलिखीत केली असुन मी

वाचुन पाहली माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष (महेष भोसले) पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. वाशिम पंच सहया 1) ,2) फिर्यादी सही अशाप्रकारच्या फिर्यादीचे रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन पुढील तपास पोनि महेश भोसले ला.प्र.वि.वाशिम यांचेकडे देण्यात आला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Devendrasinh Bahadursinh Thakur(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Gajanan J. Padmane

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Devendrasinh Bahac
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):